•बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२५ • सोमवार,दि.२६ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
•Beed (Maharashtra) •Year 3 • Issue 325 • Monday 26 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

राज्यात वाळू माफियांचा धुमाकूळ

संभाजीनगर । वृत्तसेवा

मागील काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागात वाळू माफियांचा धुमाकूळ पाहायला मिळत असून, आता त्यांची हिंमत एवढी वाढली की थेट महसूलच्या पथकावर हल्ला करण्यात येत आहे. अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तलाठीला चक्क ट्रॅक्टरच्या टायरखाली टाकण्याचा प्रयत्न हिंगोलीत करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेत पंढरपूरच्या महसूल पथकाला तलवारीचा धाक दाखवून हल्ला करण्यात आला आहे. ज्यात पथकाच्या गाडीवर दगडफेक करून गाडी फोडण्यात आली आहे.

पहिली घटना हिंगोली जिल्ह्यात समोर आली आहे. जिल्ह्यातील चीचोली गावांमध्ये अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तलाठीला आणि कोतवाल यांना मारहाण करण्यात आली आहे. पोलिसांत दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, तलाठी जगदीश दिनकर कुलकर्णी (वय ४१ वर्ष) यांच्याकडे चिंचोली गावाचा पदभार आहे. दरम्यान, याच गावात मागील काही दिवसांपासून अवैध वाळूची वाहतूक सुरु असल्याने कुलकर्णी हे सहकारी कोतवाल यांना घेऊन कारवाईसाठी गेले होते. यावेळी त्यांना ज्ञानेश्वर पतंगे यांच्यासह दोन लोकं अवैध वाळूची वाहतूक करतांना मिळून आले. त्यामुळे तलाठी कुलकर्णी यांनी संबंधित ट्रॅक्टर पकडून कारवाई सुरु केली. त्यामुळे चिडलेल्या ज्ञानेश्वर पतंगे आणि त्यांच्या चालकासह दोन अनोळखी लोकांनी कुलकर्णी यांना मारहाण केली. तसेच कोतवाल यांचा मोबाईल देखील हिसकावून घेतला. धक्कादायक म्हणजे तलाठी कुलकर्णी यांना थेट ट्रॅक्टरच्या चाकाखाली घालण्याचा प्रयत्न झाला. यावेळी झालेल्या झटापटीचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. हिंगोलीप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात देखील असाच काही प्रकार समोर आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाईसाठी गेलेल्या पथकावर थेट हल्ला करण्यात आला आहे. चंद्रभागा पात्रात बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर तहसील पथक कारवाईसाठी गेले होते. दरम्यान, गुरसले येथे कारवाईला पथक आल्याचे लक्षात येताच वाळू माफियांनी चक्क हातात तलवार घेऊन पथकाला धमकावले. तसेच, जेसीबी आणि टीपर पळवून नेले. धक्कादायक म्हणजे कारवाईसाठी आलेल्या महसूल पथकाच्या गाडीवर दगडफेक करून गाडी फोडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, पुन्हा एकदा वाळू माफियांची दहशत पाहायला मिळत आहे. हिंगोली जिल्ह्यातील चीचोली गावांमध्ये अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तलाठीला आणि कोतवाल यांना मारहाण करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वाळू माफियांकडून तलाठीला ट्रॅक्टरच्या चाकाखाली घालण्याचा प्रयत्न झाला. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. तसेच, या प्रकरणी कळमनुरी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरकारने ड्रग्जमुक्त महाराष्ट्र करावा

पुणे । वृत्तसेवा

देशातील अनेक राज्यांमध्ये ड्रग्जचा व्यापार वाढत असून तरुण पिढी ड्रग्जच्या आहारी जात आहे, हे अत्यंत घातक आहे. गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रात ज्या पद्धतीने ड्रग्जचा साठा सापडत आहे, त्यावरून 'उडता पंजाब' नंतर आता 'उडता महाराष्ट्र' अशी अवस्था राज्याची करायची आहे काय? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकार विचारला.

राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र ड्रग्जमुक्त करण्याचे घोषणा केली होती. फडणवीस केवळ घोषणा न करता ठोस भूमिका घेणार असतील तर आम्ही सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेऊन त्यांना मदत करू, त्यांच्या मागे उभे राहू, असे खासदार सुळे यांनी जाहीर केले. खडकवासला मतदारसंघातील प्रश्न समजावून घेत त्यावर तोडगा काढण्यासाठी खासदार सुळे यांनी या भागात भेट देत नागरिकांशी संवाद साधला. त्यानंतर पत्रकारांची संवाद असताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. पुणे पोलिसांनी गेल्या आठवड्यात मोठ्या प्रमाणात ड्रग्जचा साठा जप्त केला. याची पाळेमुळे लंडनपर्यंत पोहोचलेली आहेत. लोकसभेत अनेक राज्यांचे खासदार ड्रग्जच्या विषयावर नेहमी बोलत असतात. महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज सापडणे, हे धोकादायक आहे, यावर आत्ताच भूमिका घेणे गरजेचे आहे, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. राज्याचे गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांना आई, नागरिक म्हणून

विनंती ड्रग्जबाबत तुम्ही ठोस भूमिका घेणार असाल तर आम्ही राजकीय मतभेद बाजूला ठेऊन तुम्हाला मदत करू, असे सुळे म्हणाल्या. कुरकुंभ येथे इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्जची निर्मिती होत असेल आणि त्याची माहिती पोलिसांना मिळत नसेल तर हे पोलिसांचे मोठे अपयश आहे, असेही त्या म्हणाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या चिन्हाचे अनावरण करण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार हे शनिवारी रायगड येथे गेले होते. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली आहे. चाळीस वर्षांनंतर पवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण आली, अशी टीका या नेत्यांनी केली. याबाबत खासदार सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या, काय का असेना हेडलाईन्स झाली ना? पवार साहेबांचं नाव घेतल्याशिवाय हेडलाईन्स होत नाही, हे सर्वांना माहित आहे. तुमच्या प्रश्नातच उत्तर आहे.

बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे

पुणे । वृत्तसेवा

कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बारावीची परीक्षा सुरू होताच महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे शनिवारपर्यंत तब्बल ५० लाख उत्तरपत्रिकांची तपासणी रखडली होती. दरम्यान, शिक्षण मंत्र्यांनी रविवार दि. २५ रोजी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा केली तसेच अनेक मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेत त्या मान्य केल्या आहेत. त्यामुळे बारावी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे घेतल्याचे महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे यांनी जाहीर केले. महासंघाचे अध्यक्षांसह समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर, सरचिटणीस प्रा संतोष फासगे, उपाध्यक्ष प्रा सुनील पूर्णपात्रे यांनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची भेट घेत चर्चा केली. शिक्षण सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, सहसचिव तुषार महाजन सहभागी होते. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत राज्य शासनाचे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जे आदेश निघतील तेच शिक्षकांनाही लागू होतील असे मान्य केले आहे. त्यामुळे दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात देऊन त्यानंतर सेवेत रूजू झालेल्यांना जुनी पेन्शन योजना लागू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच दि १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन अनुकूल असून त्याबाबत लवकरच निर्णय जाहीर होणार आहे. वाढीव पदावरील प्रलंबित असलेल्या २५३ शिक्षकांच्या त्रुटी पूर्तता केली.

भाजपाला लोकशाही नकोय -आदित्य ठाकरे

पुणे । वृत्तसेवा

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडली असून सर्वसामान्य जनता हतबल झाली आहे. काही राजकीय मंडळी गुंडांना भेटून त्यांचे सत्कार करतात. तर दुसर्या बाजूला पोलीस स्टेशनमध्ये गोळीबाराची घटना घडते. त्या सर्व घडामोडी दरम्यान आता ड्रग्ज सापडत आहेत. अमली पदार्थांपासून तरुणांनी दूर राहिले पाहिजे. त्यामुळे राज्यात सरकार आहे की नाही, हा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच काही आमदार पोलिसांबाबत काहीही विधान करत आहेत. आम्हाला कोणी हात लावू शकत नाही. त्यामुळे हे सरकार बिल्डर, ठेकेदार की सर्व सामान्य नागरिकांचे सरकार आहे अशी टिका शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते , माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषदेमध्येकेली आहे. यावेळी माजी खासदार ड. वंदना चव्हाण , माजी आमदार मोहन जोशी उपस्थित होते. आदित्य ठाकरे म्हणाले, पुण्यातील रुबी हॉल पासून पुढे जाणाऱ्या मेट्रो प्रकल्पाचे काम देखील पूर्ण झालेले आहे आणि विमानतळाच्या ट्रमिनअल दोनचे उदघाटन अदयाप ही होत नाही. विमानतळावर सीसीटीव्ही कॅमेरे लावले नाही म्हणुन पाच महिने झाले विमानतळाचे उदघाटन झाले नाही. केवळ व्हीआयपींना वेळ नसल्याने

अद्यापपर्यंत उद्घाटन झाले नाही. तसेच दुसर्या एका पुलाचे काम अर्धवट आहे. त्याचे उदघाटन करण्यास घटनाबाह्य मुख्यमंत्री आतुर असल्याचे दिसत आहे. आजपर्यंत अर्धवट पुलाच्या कामाचे उदघाटन कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी केल्याचे आपण पाहिले आहे का? काल पोर्णिमा असल्याने त्यांना वेळ नव्हता. अमावस्या आणि पोर्णिमेला शेती करायला जातात. हे त्यांच्या आजवरच्या दौर्यांवरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे आता तरी पुलाचे उद्घाटन करून नागरिकांची वाहतूक कोंडीमधून सुटका करा, अशी भूमिका मांडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर त्यांनी टीका केली.

राज्यातील छोटे छोटे पक्ष संपवा असे विधान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. त्या प्रश्नावर आदित्य ठाकरे म्हणाले की, भाजपने लोकशाही संपवली आहेच. २०२२ मध्ये शिवसेना, २०२३ मध्ये राष्ट्रवादी फोडली आणि त्यांचा एक परिवार फोडला. तसेच आता २०२४ मध्ये काँग्रेस पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच भाजपाला लोकशाही नको आहे आणि तुम्ही मला ज्या व्यक्ती बाबत प्रश्न विचारला, त्यांचा चायनाशी जवळचा संबध असल्याचे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. निवडणूक आयोगाच्या सूचना असतानाही आणि चार वर्षे पूर्ण झालेली असतानाही अनेक शहरांचे आयुक्त देखील बदलले नाहीत, या मागचं गौडबंगाल काय असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमच्या सर्व मित्र पक्षांशी चर्चा सुरू आहे. जागा वाटपावर चर्चा सुरू असून पुढील काही दिवसात त्याचा निर्णय जाहीर होईल. आम्ही जागा वाटपात मध्ये कोणीही भांडत नाही. महाविकास आघाडीतील जागा वाटपाबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतली. आम्ही जागासाठी नव्हे महाराष्ट्रासाठी लढत आहे. भाजप आणि त्यांना साथ देणाऱ्या पक्षांना सत्तेतून खाली घेण्यासाठी आवश्यक ती रणनीती तयार केली जात असल्याचे आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

महासंस्कृती महोत्सवात आपली संस्कृती उजळून निघावी -अभिनेता अनासपुरे

बीड । प्रतिनिधी

तरुण पिढीला स्थानिक लोककलांची, खाद्य संस्कृतीची ओळख होण्यासाठी महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन महत्वाचे असल्याचे प्रतिपादन विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांनी आज महासंस्कृती महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी केले. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महासंस्कृती महोत्सवाचे थाटात उद्घाटन छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन सुप्रसिध्द सिने अभिनेते मकरंद अनासपुरे, पद्मश्री बशीर मामू, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, विकास उपायुक्त सुरेश बेदमूथा, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांच्यासह अन्य मान्यवर मंचावर उपस्थित होते.

महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व दीप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी महिला स्वयंसहायता बचत गटातर्फे निर्मित विविध वस्तू व खाद्यपदार्थाच्या, कृषी विभागाकडून लावण्यात आलेल्या दालनाला मान्यवरांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली. यावेळी विशेष सत्कार पद्मश्री शब्बीर मामू, यांच्यासह जागतिक स्तरावर खेळातील उत्कृष्ट कामगिरी केलेले थलेटिक्स अविनाश साबळे, क्रिकेटर सचिन संजय धस, तायक्वांदो नयन अविनाश बारगजे व अविनाश पांचाळ आदि खेळाडू, प्रशिक्षक तसेच खेळाडूंच्या



कुटुंबातील सदस्यांचा गौरव करण्यात आला. त्तपुर्वी शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथुन शोभायात्रा काढण्यात आली. श्री. आर्दड पुढे म्हणाले की, आपला सांस्कृतिक वारसा हा येथे सर्व समाजातील या संस्कृतीचा पाया सशक्त असा आहे तो इथल्या खाण्या-पिण्यातून आणि जगण्यातून दिसतो. त्यामुळेच्या आपल्या आधीच्या पिढीतील लोक वागण्या बोलण्यातून संतुलित अशी असायची हीच लोप पावत असलेली सशक्त संस्कृती महासंस्कृती महोत्सवाच्या माध्यमातून पुन्हा लोकांसमोर उभी करण्याचा मानस आहे. या महोत्सवात लोक पावलेली खाद्य संस्कृती सोबतच लोककलांना प्रोत्साहन देण्यासाठी हा मंच शासनाने उभा करुन दिला आहे. अधिकाधिक लोकांनी या महोत्सवात येवून मनोरंजनासोबत खाद्य संस्कृती आणि लोककलांचा आनंद लुटावा असे आवाहनही त्यांनी केले.

महासंस्कृती महोत्सवात आपली संस्कृती उजाळून निघावी, असे उदघाटनाप्रसंगी प्रमुख उदघाटक म्हणून लाभलेले सिने अभिनेता मकरंद अनासपुरे यावेळी म्हणाले. ते पुढे म्हणाले, स्थानिक उत्पादने खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल असला पाहिजे, बचत गटाच्या महिलांनी दर्जेदारपणे बनविलेले पिढी जात पदार्थ खरेदी करून त्याचा स्वाद घ्यावा. पूर्वी गावात निर्मित होणारा माल गावातच विकला जायचा त्यामुळे स्थानिक व्यवसायांना उभारी मिळत असे. त्यामुळे महासंस्कृती महोत्सवातील विविध स्टॉल वरील पदार्थ केवळ न बघता खरेदी करावीत. असे आवाहनही त्यांनी आवर्जून केले. आपला अंशतः सहभाग व्यवसाय उभारणीसाठी महत्त्वाचा आहे भगिनींचे प्रॉडक्ट विकत घेऊन त्यांचा व्यवसाय वाढवावा. तरी महासंस्कृती महोत्सवाचा उपक्रम अतिशय स्वागतार्ह आहे. असेही त्यांनी सांगितले. तसेच स्टॉलवरील स्वयंसहायता बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थाची आवर्जून खरेदी करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी केले. बीड शहरात आगळावेगळा महा संस्कृती महोत्सव पुढील पाच दिवस छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित करण्यात आलेला आहे. या महोत्सवासस्थानी कलाकारांना मंच तर व्यवसायिकांना स्टॉलची उभारणी करून देण्यात आलेली आहे. स्थानिक कलावंतांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संधी देण्यात येणार आहे. महोत्सवात बीड जिल्ह्याचे नाव ज्यांनी उंचावर नेले अशा व्यक्तींचा सत्कार व सन्मान या ठिकाणी केला गेला. महोत्सवात २०० बचत गटांचे स्टॉल, कृषी स्टॉल लावण्यात आले असून शेतकऱ्यांनी व नागरिकांनी महासंस्कृती महोत्सवा उपस्थित रहावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला चंपावती विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. तर यावेळी स्थानिक लोक कलावंतांनी यात कन्या भृण हत्या विरोधी जाकरुकता पसरवणारा जोगवा, गोंधळ, वासूदेव, पोवाडा, आणि जागो हिंदुस्थानी ग्रुप यांचा देशभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात सादर करण्यात झाला.

राज्य शासनाची भरती करणारी एमपीएससीच कंत्राटीवर

मुंबई : राज्य शासनासाठी हजारो पदांची पदभरती करणाऱ्या राज्य लोकसेवा आयोगावर (एमपीएससी) स्वतःसाठी कंत्राटी पद्धतीने पदे भरण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे, कंत्राटी पद्धतीने शासनात भरती करण्याबाबत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. या वादानंतर कंत्राटी पदभरतीचा निर्णय शासनाने रद्द करून यापुढे कंत्राटी पद्धतीने पदभरती न करण्याची घोषणा केली होती. मात्र, शासनाच्या या भूमिकेलाच एमपीएससीकडून हरताळ फासण्यात आला आहे.

जाहिर प्रगटन

तमाम लोकास व विशेष करुन अंबादास काशिनाथ ठोबर रा. मु.पो. निंबोडी, ता. जि. अहमदनगर, जयश्री सारंगधर शिंदे, रा. सिटीझन कॉलनी, भिंगार, अहमदनगर. व उत्तम सोनबा गवळी, आठरे पाटील शाळे जवळ, सावेडी, अहमदनगर. यांना सदर जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १. सद्गुरु गजेंद्र सराणे रा. कोर्ट गल्ली, अहमदनगर, २. विजय अनिल भुतकर, रा. विजयनगर, भिंगार, अहमदनगर. व ३. लोकेश ईश्वरदास मेहताणी, रा. सावतानगर, भाग्यदेवळे, भिंगार, अहमदनगर यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन कळविण्यात येते की,

जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगर पैकी, जिल्हापरिषद हद्दीतील, मौजे निंबोडी मधील गट नं.३२९ चे एकुण क्षेत्र ४हे. ६२आर यापैकी ८क. ०६ पैसे. यापैकी ३हे. ०० आर क्षेत्र याची चतु:सिमा- सरकारी व प्रत्यक्ष वहिवाटीप्रमाणे असुन सदर मिळकत बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांनी त्यांच्या मालकीची आहे व त्याकामीचे सर्व मुळ खरेदीखताचे दस्त व मुळ कागदपत्र आमच्या अशिलास दाखवुन सदर त्यांनी त्यांच्या मालकीची असल्याची दाखवुन आमच्या अशिलाची खात्री करुन दिल्यावर सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर केलेला आहे व बाळासाहेब पुजांजी जगदाळे यांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रांवर विश्वास ठेवुन सदर गट नं. ३२९ पैकी ३हे. ०० आर जमिन खरेदी घेण्याकामी बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांच्याबरोबर व्यवहार केला व दि.१६/०९/२०२३ रोजी बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांनी आमच्या अशिलास नोटरी पब्लीक ॲड. तनवीर महंमद शेख यांच्याकडे विसारपावती नोंदवुन दिलेली आहे. व त्याच दिवशी सदर मिळकतीचे सर्व मूळ खरेदीखताचे दस्त व मूळ कागदपत्रे आमच्या अशिलास दिलेले आहे. सदर व्यवहाराची मुदत ३ महिने ठरली होती व सदर व्यवहाराची मुदतीमध्ये सदर मिळकतीवर असलेला बँक ऑफ बडोदा व विक्रीकर उपायुक्त अहमदनगर मुल्यवर्धीत कर कायदा बोजा सदर मिळकत मालक बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांनी कमी करुन देण्याचे कबुल व मान्य केले होते व त्यासाठी देखील बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांनी आमच्या अशिलाकडुन रक्कम घेतलेली होती व आहे. आमचे अशिल सदैव सदर व्यवहार पूर्ण करण्याच्या तयारीत होते व आहे व आमच्या अशिलाने सदर मिळकत खरेदी घेण्यासाठी ठरलेल्या मोबदला रकमेची व्यवस्था देखील करुन ठेवलेली होती व आहे व ठरल्याप्रमाणे आमचे अशिल सदर मिळकतीचा ठरलेला व्यवहार पूर्ण करण्यास सदैव तयार होते व आहेत. आमच्या अशिलाचा व बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांच्या मध्ये झालेला सदर व्यवहार लेखी करार अस्तित्वात असुन तो कुठल्याही प्रकारे रद्द झालेला नाही अशा परिस्थितीत देखील बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांनी दि.३९/०१/२०२४ रोजी बेकायदेशीरपणे मिरा सुजित सावंत, पुनम संदिप घुमाळ उर्फ पुनम रामदास सांगळे व बबलु उर्फ बबुल रामदास सांगळे, हिराबाई रामदास सांगळे व शरद रामदास सांगळे यांच्याकडुन दुय्यम निबंधक कार्यालयात दुरुस्तलेख करुन घेऊन सदर गट नं. ३२९ पैकी २हे.००आर जमिनीचे नोंदणीकृत साठेखत अंबादास काशिनाथ ठोबरे रा. मु.पो. निंबोडी, ता. जि. अहमदनगर, जयश्री सारंगधर शिंदे, रा. सिटीझन कॉलनी, भिंगार, अहमदनगर. व उत्तम सोनबा गवळी, आठरे पाटील शाळे जवळ, सावेडी, अहमदनगर. यांना दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदवुन दिले व त्यास मिरा सुजित सावंत, पुनम संदिप घुमाळ उर्फ पुनम रामदास सांगळे व बबलु उर्फ बबुल रामदास सांगळे, हिराबाई रामदास सांगळे व शरद रामदास सांगळे यांनी संमती दिलेली आहे. सदरचे साठेखत नोंदणीकृत साठेखत दस्त क्र.१०८३/२०२४ अन्वये दुय्यम निबंधक कार्यालय अहमदनगर उत्तर-२ यांच्या कार्यालयात नोंदविले असुन ते बाळासाहेब पुंजाजी जगदाळे व मिरा सुजित सावंत, पुनम संदिप घुमाळ उर्फ पुनम रामदास सांगळे व बबलु उर्फ बबुल रामदास सांगळे, हिराबाई रामदास सांगळे व शरद रामदास सांगळे यांनी संगनमत करुन बेकायदेशीरपणे आमच्या अशिलाचे हक्क डावलण्याच्या दुष्ट व कुटील हेतुने अंबादास काशिनाथ ठोबर, जयश्री सारंगधर शिंदे व उत्तम सोनबा गवळी यांना नोंदवुन दिलेले आहे व जाणुन-बुजुन मिळकतीमध्ये त्रयस्त इसमाचे हक्क प्रस्थापित करण्याच्या बेकायदेशीर प्रयत्न चालु केलेला आहे अशी खात्री लायक माहिती आमच्या अशिलास मिळालेली आहे.

त्यामुळे प्रस्तुत जाहिर प्रगटनाद्वारे तमाम लोकास व विशेष करुन अंबादास काशिनाथ ठोबर, जयश्री सारंगधर शिंदे व उत्तम सोनबा गवळी यांना कळविण्यात येते की मौजे निंबोडी मधील गट नं. ३२९ चे एकुण क्षेत्र ४हे. ६२आर यापैकी ८क. ०६ पैसे. यापैकी बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांचे नावे असलेल्या ३हे.०० आर बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांच्या बरोबर अथवा नोंदणीकृत साठेखतामध्ये नमुद २हे. ०० आर क्षेत्र बाबत अंबादास काशिनाथ ठोबर, जयश्री सारंगधर शिंदे व उत्तम सोनबा गवळी यांच्याबरोबर कुणीही कुठल्याप्रकारे सदर जमिनीचा खरेदी विक्रीचा आर्थिक व्यवहार, साठेखत, करार, हस्तांतरण दस्त इत्यादी करु नये त्याचप्रमाणे अंबादास काशिनाथ ठोबर, जयश्री सारंगधर शिंदे व उत्तम सोनबा गवळी यांना देखील जाहिरपणे कळविण्यात येते त्यांनी देखील साठेखताच्या आधारे बाळासाहेब पुंजाजी जगदाळे यांच्याबरोबर केलेल्या साठेखताच्या आधारे खरेदीखताचा व्यवहार अथवा हस्तांतरणाचा दस्त नोंदवु नये अगर केल्यास सदरचे हस्तांतरणाचे दस्त आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना सदर मिळकतीमध्ये कुठलेही कायदेशीर मालकीहक्क, टायटल व अधिकार मुळीच प्राप्त होणार नाही याची नोंद घ्यावी. परंतु कोणाचीही कुठल्याही प्रकारची आर्थिक फसवणुक होऊ नये या हेतुने प्रस्तुतचे जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले असे.

ता. १२/०२/२०२४.
अहमदनगर.

ॲड. समीर बत्तारे
पत्ता :- ऑफीस नं. ५, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०१९६७८९९९. ९८६०८०५५५९

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीच्या व्यवहाराची आमचे अशिलाबरोबर व्यवहार झालेला आहे. सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वंध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुद्दलीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक - १२/०२/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन - जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे निंबळक येथील खालील वर्णनाची मिळकत-

सर्व्हे नंबर	प्लॉट नं.	क्षेत्रफळ
१/१४१४२	१३	५७७.६० चौ.मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - नगर मनमाड रोड — दक्षिणेस - प्लॉट नंबर १२
पश्चिमेस - सावेडी गावठाण रोड — उत्तरेस - प्लॉट नंबर १४

यावर बांधण्यात आलेल्या प्रकल्पाचे नांव बंगढीवाला टॉवर यापैकी

अ) ग्राउंड फ्लोअर मधील शोरुम नंबर ००१ याचे कारपेट क्षेत्र १७१.६३ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १८१.३५ चौ. मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - नगर पुणे रोड — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - ओपन रेअर मार्जिन — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

ब) फर्स्ट फ्लोअर मधील ऑफिस नंबर १०१ याचे कारपेट क्षेत्र १०१.९६ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १०८.३९ चौ.मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - शोरुम डबल्स हाईट — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - ओपन रेअर मार्जिन — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

सदर मिळकत अ व ब याचे विद्यमान मालक-
१. श्री. जितेंद्र शामसुंदर बिहाणी
२. सौ. शारदा जितेंद्र बिहाणी ३. श्री. महेश शामसुंदर बिहाणी
४. सौ. किशोरी महेश बिहाणी
सर्व रा. सावेडी, अहमदनगर

क) सेकंड फ्लोअर मधील सदनिका नंबर २०१ याचे कारपेट क्षेत्र ७९.६० चौ.मी., बिल्टअप क्षेत्र ८५.४० चौ.मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - ऑफिस नंबर २०२ — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - ओपन रेअर मार्जिन — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

ड) सेकंड फ्लोअर मधील ऑफिस नंबर २०२ याचे कारपेट क्षेत्र ८८.७४ चौ. मी., बिल्टअप क्षेत्र ९५.४२ चौ. मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - नगर पुणे रोड — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - सदनिका नंबर २०१ — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

ड) थर्ड फ्लोअर मधील सदनिका नंबर ३०१ याचे कारपेट क्षेत्र १७१.६३ चौ. मी., बिल्टअप क्षेत्र १८१.३५ चौ.मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - नगर पुणे रोड — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - ओपन रेअर मार्जिन — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

इ) फोर्थ फ्लोअर मधील सदनिका नंबर ४०१ याचे कारपेट क्षेत्र १३२.९८ चौ.मी., बिल्टअप क्षेत्र १४०.६९ चौ. मी. बाल्कनी क्षेत्र ४०.६६ चौ मी.

यांशी चतु:शीमा -
पुर्वेस - टेरेस — दक्षिणेस - ओपन साईड मार्जिन
पश्चिमेस - ओपन रेअर मार्जिन — उत्तरेस - ओपन साईड मार्जिन

सदर मिळकत क ते उ याचे विद्यमान मालक-
श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर

ॲड. सौ. सुषमा प्रविण बडवे
ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी
ॲड. सौ. नूतन प्रणव धर्माधिकारी
मो.नं.९७२८००८२००
पत्ता - भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहमदनगर

जाहिर प्रगटन

(मौजे सुंदरवाडी ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येतील गट नं. 38 पैकी प्लॉट नं. 23 ज्याचे विक्री क्षेत्रफळ 1412.5 चौ. फूट (131.27 चौ.मी) खरेदी बाबत)

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री. अण्णासाहेब दिगंबरराव फावडे रा. मालपाणीनगर, लगस्कर बिल्डिंग समोर, औसा रोड, लातूर** यांचे मालकी व ताब्यात असलेली खालील परिशिष्टातील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा करार केलेला आहे.

तरी सदरील मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, विक्री, इतर लीज, चोरी-बांगडी, उजर/आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून **सात (7) दिवसाच्या** आत मूळ कागदपत्रासह आपला उजर/आक्षेप लेखी स्वरूपात माझ्या खालील नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर नोंदवावा व त्याची पोहोच घ्यावी. मुदतीत कुणाचाही उजर/आक्षेप न आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व दोषमुक्त आहे असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे परिशिष्ट : मौजे सुंदरवाडी ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येतील गट नं. 38 पैकी प्लॉट नं. 23 ज्याचे विक्री क्षेत्रफळ 1412.5 चौ. फूट (131.27 चौ.मी) कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे.

पूर्वेस : प्लॉट नं. 22, पश्चिमेस : 16'.6" रुंद रोड, दक्षिणेस : गट नं. 39 चा भाग, उत्तरेस : प्लॉट नं. 24.

करिता हे जाहीर प्रगटन
दिनांक : 23/02/2024

जाहीर प्रगटन देणार मार्फत

ॲड.संदीप गंगाधरराव देवगावकर

पत्ता : प्लॉट नंबर 17, गुरुजन हाऊसिंग सोसायटी, वीर सावरकर चौक, छत्रपती संभाजीनगर.
मो. 9423777765 / 8329545311

मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122.

(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिव्हेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क. दिनांक 01/02/2024

जाहीर नोटीस

अर्जदार : नाथ मल्टीस्टेट को. ऑप, क्रेडिट सोसायटी लि. मालेगाव (खुर्द) ता. गेवराई जि. बीड

विरूध्द – गैरअर्जदार

1. लवाद अर्ज क. 536/2022 (1) शिवप्रकाश भगवान काकडे रा. जयभवानी सहकारी साखर कारखाना लि. गढी ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) संतोश प्रल्हाद शिंदे रा. खांडवी ता. गेवराई जि बीड. (3) दत्ता भगवान काकडे रा. निपाणीजवळ, जळगाव पो. पाचेगाव ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

2. लवाद अर्ज क. 540/2022 (1) विश्वनाथ संदिपान लांडे (कर्जदार) (2) परमेंश्वर कल्याण दुबाले दोघे रा. सांडरवण ता. जि बीड. (3) रितेश भिमराव जाधव रा. लोणी शहाजानपुर ता. जि. बीड (दोघे जामीनदार)

3. लवाद अर्ज क. 539/2022 (1) अरूण भगवान आहेर (कर्जदार) (2) भगवान नाथा आहेर (3) विठठल रोहीदास आहेर रा. म्हाळस पिंपळगाव पो. राक्षसभुवन ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

4. लवाद अर्ज क. 538/2022 (1) मच्छिंद्र केशव खराद (कर्जदार) (2) महेश मच्छिंद्र खराद (3) सावता सिताराम दुधसागर रा. सर्व मालेगाव खुर्दे ता गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

5. लवाद अर्ज क. 523/2022 (1) प्रभाकर दगडु घोंगडे (कर्जदार) (2) गंगासागर प्रभाकर घोंगडे (3) संजय किसनराव गोर्डे रा. सर्व बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

6. लवाद अर्ज क. 535/2022 (1) ज्ञानेश्वर सर्जेराव मोटे (कर्जदार) (2) दिपक सर्जेराव मोटे दोघे रा. ताकडगाव पो. केकत पांगरी ता गेवराई जि बीड. (3) अशोक शिवाजीराव शेळके रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

7. लवाद अर्ज क. 527/2022 (1) गोरख त्रिबंक फोपसे (कर्जदार) (2) गोरख सुधाकर गोर्डे (3) दत्तात्रय त्रिबंक फोपसे रा. बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

8. लवाद अर्ज क. 526/2022 (1) किशोर बबन काळे (कर्जदार) (2) सोनाली किशोर काळे (3) गणेश शंकर रूळे रा. बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

9. लवाद अर्ज क. 210/2023 (1) अनिल सर्जेराव चोरमले (कर्जदार)(2) राधाकिसन बाबुराव बुडखे (3) ज्ञानेश्वर बाबासाहेब मस्के रा. सर्व कांबी ता. शेवगाव जि. अहमदनगर (दोघे जामीनदार)

10. लवाद अर्ज क. 169/2023 (1) भाउसाहेब लक्ष्मण काशिद (कर्जदार)(2) अशोक लक्ष्मण काशिद रा. दोघे सुकळी ता. शेवगाव जि. अहमदनगर (3) बाळु भिवराज घोडके रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

11. लवाद अर्ज क. 494/2022 (1) सईदा बेगम पिरमहंमद पठान रा. आझाद नगर, शाहुनगर, बीड (कर्जदार) (2) शेख फरजाना शेख महेबुब रा. काझी नगर, बालेपीर, बीड (3) नसरिन बेगम मोमीन सलीम रा. देवी मंदिर, खासबाग, बीड ता. जि. बीड (दोघी जामीनदार)

12. लवाद अर्ज क. 476/2022 (1) विदया संजय वडमारे रा. आशा टॉकीजजवळ, बीड (कर्जदार) (2) कांता सखाराम गायकवाड रा. सेंटर नं ऐ 3–2, हिदुंस्तान आवास, पैठण रोड, नक्षत्रवाडी, ता. जि. औरंगाबाद (3) छाया अशोक साबळे रा. भिमराज नगर, राजुरी वेस, बीड (दोघी जामीनदार)

13. लवाद अर्ज क. 167/2023 (1) सुनिल जगन्नाथ औटे (कर्जदार)(2) राहुल सुनिल औटे दोघे रा. मालेगाव खुर्दे ता. गेवराई जि. बीड (3) धर्मराज गणपत माने रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

14. लवाद अर्ज क. 542/2022 (1) संजय भगवान कनके (कर्जदार)(2) आत्माराम विठठल कनके(3)गणेश काशिनाथ कनके रा. भांबेरी ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

15. लवाद अर्ज क. 551/2022 (1) विलास आश्राजी पाटील रा. ताकडगाव रोड, माउली नगर, गेवराई ता गेवराई जि. बीड (कर्जदार)(2) भाउसाहेब सिताराम शेंबडे रा. तांदळा ता. गेवराई जि. बीड (3) अनंता प्रभाकर धोंडरे रा. जातेगाव ता. गेवराई जि. बीड (4) जयसिंग अनुरूद्र सोलाट रा. गौंडगाव ता. गेवराई जि. बीड. (तीघे जामीनदार)

16. लवाद अर्ज क. 550/2022 (1) विष्णु रामकिसन टेकाळे (कर्जदार)(2) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे दोघे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (3) किशोर विक्रम गोजरे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

17. लवाद अर्ज क. 549/2022 (1) दिनकर अप्पाजी गोजरे (कर्जदार)(2) किशोर विक्रम गोजरे दोघे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (3) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

18. लवाद अर्ज क. 548/2022 (1) किशोर विक्रम गोजरे (कर्जदार)(2) कांता दिनकर गोजरे दोघे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (3) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

19. लवाद अर्ज क. 547/2022 (1) भागवत मोहन नरवडे (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर मारोती थोटे(3) प्रभाकर बप्पासाहेब काळे रा. सर्व चौंढाळा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

20. लवाद अर्ज क. 646/2022 (1)राजेंद्र अशोक खराद(कर्जदार)(2) छडीदार गणेश बाबासाहेब(3) दादासाहेब अशोक खराद रा. सर्व सोलनापुर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

21. लवाद अर्ज क. 645/2022 (1) शेख पीर महंमद रज्जाक (कर्जदार) (2) कैलास वामन चोरमले(3) शेख लता रज्जाक रा. सर्व कांबी शेवगाव जि. अहमदनगर (दोघे जामीनदार)

22. लवाद अर्ज क. 541/2022 (1) विशाल बाळासाहेब आवारे (कर्जदार) (2) गणेश बाळासाहेब आवारे (3) गणेश पांडुरग घोरतळे रा. सर्व विहामांडवा ता. पैठण जि औरंगाबाद (दोघे जामीनदार)

23. लवाद अर्ज क. 544/2022 (1) शेख अपलातुल निजाम (कर्जदार) (2) शेख शकीला निजाम (3) रामकिसन लक्ष्मण मोरे रा. सर्व विहामांडवा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

24. लवाद अर्ज क. 454/2022 (1) बबीता दगडु वीर रा. तळवट बोरगाव ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) आशा भाउसाहेब वाघमारे(3) सोनाली प्रदिप वाघमारे रा. महाराष्ट्र बॅक कॉलनी, शिंदे नगर, बीड ता. जि. बीड (दोघे जामीनदार)

25. लवाद अर्ज क. 70/2023 (1) नवनाथ कुंडलिक गवारे (कर्जदार) (2) नंदाबाई नवनाथ गवारे (3) परमेश्वर भिवराज मोरकर रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

26. लवाद अर्ज क. 68/2023 (1) शेख अन्सर खाजामिया (कर्जदार) (2) शेख बाबु महेबुब(3)शेख मन्सुर पापा रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

27. लवाद अर्ज क. 69/2023 (1) शेख मन्सुर पापा (कर्जदार) (2) शेख बाबु महेबुब (3) शेख अन्सर खाजामिया रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

28. लवाद अर्ज क. 71/2023 (1) उध्दव गोविंदराव ठोसर (कर्जदार) (2) भागवत सुभाष पाचे (3) सारंगधर गोविंद ठोसर रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

29. लवाद अर्ज क. 73/2023 (1) मनोहर साहेबराव मस्के (कर्जदार) (2) गोरख मनोहर मस्के (3) सुनिल प्रल्हाद मस्के रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

30. लवाद अर्ज क. 75/2023 (1) विष्णु राजाराम आंधळे (कर्जदार) (2) पोपट रघुनाथ सोनवणे (3) रंजना विष्णु आंधळे रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

31. लवाद अर्ज क. 78/2023 (1) नितीन शरद गवारे (कर्जदार) (2) शिवाजी संपत गवारे (3) बाळासाहेब अनिल चव्हाण रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

32. लवाद अर्ज क. 79/2023 (1) सुनिता नितेश नरवडे (कर्जदार) (2) मिरा संतोष नरवडे दोघे रा. सातारा गाव, सातारा परिसा, औरंगाबाद ता जि. औरंगाबाद (3) राम जिजा काळे रा. मल्हार वाडी, सातारा गाव ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

33. लवाद अर्ज क. 80/2023 (1) कल्याण सोपान कुंडकर रा. भाटेपुरी पो. खांडवी ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) नरहरी संताराम नाईक रा. धनगर गल्ली, घनसांगवी ता. घनसांगवी जि. जालना (3) सतलिंग राम समशेटे रा. घर नं 83/1, गिता विदयालयाजवळ, सिडको, गारखेडा परिसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

34. लवाद अर्ज क. 82/2023 (1) प्रशांत छगनराव गाडेकर (कर्जदार) (2) छगन नागराव गाडेकर दोघे रा. क्रांतीचौक पोलिस स्टेशन मागे, शिवाजी कॉलनी, समता नगर, औरंगाबाद(3)अमोल हरीभाउ तायडे रा. प्लॉट नं 6, सर्वे नं 94, 6–सी रेसिडन्सी कॉलनी, राम मंदिरामागे, देवळाई, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

35. लवाद अर्ज क. 85/2023 (1) सचिन विनायक साळवे (कर्जदार) (2)प्रतिक्षा सुरेश धुमाळ रा. डी–15, 548, अंबेकर किराणा जवळ, नागसेन नगर, औरंगाबाद (3) आनंद रमेश मिसाळ रा. घर नं 6 लाईन नं 5, तायरभाई फलोअर मिल जवळ, नागसेन नगर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद(दोघे जामीनदार)

36. लवाद अर्ज क. 84/2023 (1)गोपीनाथ सदाशिव आंधळे (कर्जदार) (2) सदाशिव किसन आंधळे (3) बाळासाहेब सदाशिव आंधळे रा. सर्व आंधळेवाडी ता. केज जि. बीड (दोघे जामीनदार)

37. लवाद अर्ज क. 83/2023 (1) सचिन श्रीरंग दुबे रा. नागसेन नगर, गल्ली नं 4, उस्मानपुरा, औरंगाबाद (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर वसंत सोनवणे रा. ग्रामपंचायत जवळ, सातारा गाव औरंगाबाद (3) अशोक दशरथ काळे रा. प्लॉट नं 21, गट नं 105, साई नगर, अयप्पा मंदिराजवळ औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

38. लवाद अर्ज क. 81/2023 (1) अजिम बशिर शहा रा. ग्रामपंचायत जवळ, सातारा खंडोबा, औरंगाबाद(कर्जदार) (2) बबन तुकाराम शेजुळ रा. प्लॉट नं 11 गट नं 171, पंचवटी होम सोसायटी, पी डी जवळकर शाळेजवळ, औरंगाबाद (3) राजु अशोक पवार रा. बाळापुर ता. बायपास रोड, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

39. लवाद अर्ज क. 297/2023 (1) कावेरी राजेंद्र काळे(कर्जदार) (2) राजेंद्र बाबुराव काळे.(3) प्रकाश हरीभाउ काळे रा. चौढाळा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

40. लवाद अर्ज क. 299/2023 (1) रजनीश प्रकाश कनके (कर्जदार) (2) सुखदेव हरीभाउ मुळे (3) सोपान रामदास केजभट रा. सर्व भांबेरी ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

41. लवाद अर्ज क. 390/2023 (1) शिवाजी भगवान गारूळे (कर्जदार) (2) अनिल पांडुरंग बर्वे रा. (3) विठठल भाउसाहेब गारूळे रा. दहयाळा ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

42. लवाद अर्ज क. 234/2023 (1) अभिजीत सुंदरराव इंदे (कर्जदार) (2) अविनाश सुंदरराव इंदे (3) सोमनाथ बापुसाहेब गरूड रा. सर्व माटेगाव ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

43. लवाद अर्ज क. 236/2023 (1) तुकाराम पुरूषोत्तम कुलकर्णी (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर रामराव हिंगे (3) अभिजीत सुंदरराव इंदे रा. सर्व माटेगाव ता. गेवराई जि. बीड(दोघे जामीनदार)

44. लवाद अर्ज क. 237/2023 (1) महादेव आसाराम औटी (कर्जदार) (2) सुरेखा राजाभाउ औटी रा. दोघे बोरी पिंपळगाव ता गेवराई (3) संतोष रावसाहेब दिलवाले रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

45. लवाद अर्ज क. 238/2023 (1)शंकर बबनराव औटी (कर्जदार) (2) सुहास कल्याणराव औटी (3) ऋशिकेश रामराव देशमुख रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

46. लवाद अर्ज क. 239/2023 (1) विकास विक्रम शिंदे (कर्जदार) (2) सुर्दशन रत्नाकर जाधव रा. खळेगाव ता गेवराई (3) शेखर सुधाकर आहेर रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

47. लवाद अर्ज क. 240/2023 (1) मोहन नाराण निकम (कर्जदार) (2) विजय बंकट जगताप (3) तुकाराम हरीभाउ पायगुडे रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

48. लवाद अर्ज क. 241/2023 (1) स्वप्निल दादासाहेब औटी (कर्जदार) (2) मोहन नारायण निकम (3) विजय बंकट जगताप रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 13/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

शिक्का

ज्येष्ठ नागरिकांना घरबसल्या मतदान -मुख्य निवडणूक आयोग

पुणे । वृत्तसेवा

वयोमान, आजारपणामुळे अनेक ज्येष्ठ मतदारांना त्यांचा मतदानाचा अधिकार बजावताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होतो. हे टाळण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून ८० वर्षापुढील ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांसाठी 'घरातून मतदान' या विशेष उपक्रमाद्वारे घरातूनच मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अपर मुख्य सचिव तथा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली. देशपांडे म्हणाले, अनेकदा ज्येष्ठ नागरिकांचे वयोमान, त्यांचे आजारपण या कारणांमुळे त्यांना मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होता येत नाही. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे यासाठी हा उपक्रम निवडणूक आयोगातर्फे प्राधान्याने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मतदार यादीमध्ये चिन्हांकित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना १२ -डि क्रमांकाचा अर्ज पुरविण्यात येणार असून तो भरुन निवडणूक घोषित झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. जिल्हाधिकारी या मागणीवर अंतिम निर्णय घेणार असून त्यानंतर प्रत्यक्ष

मतदानासाठी तात्पुरत्या मतदान केंद्राची उभारणी संबधित मतदाराच्या घरी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ मतदारांसाठी ही एक संधी असली तरीही ज्यांना शक्य आहे अशा ज्येष्ठ नागरिकांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे आणि इतरांना आदर्श घालून द्यावा असे आवाहन देशपांडे त्यांनी केले. ते पुढे म्हणाले, निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून, मतदानामुळे लोकशाही बळकट होते. या प्रक्रीयेत सर्वांनी सहभागी होण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर वगळण्यात आलेल्या मतदार यादीतील नावांची स्वतंत्र यादी ठेवण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया, मतदान प्रक्रिया तसेच मतमोजणीची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी आणि

प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढावा आणि पर्यायाने मतदानाचा टक्का वाढावा यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणावर घेण्याचे निवडणूक आयोगाने नियोजन केले आहे. निवडणूक आयोगाने केलेल्या नवीन बदलांची कोटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यासाठी जिल्हानिहाय आढावा घेण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणूक कार्यासाठी कर्तव्यावर असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे यासाठी, सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती, वेब कास्टींग, संवेदनशील मतदान केंद्राची निगराणी, आदर्श आचार संहितेच्या भंगाच्या तक्रारींबाबत सी-व्हीजील पच्या माध्यमातून कार्यवाही या बाबींवर भर देण्यात आला आहे.

मोदींच्या कार्यक्रमासाठी मंडप कोसळला

यवतमाळ - येथून मोठी बातमी समोर येत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यक्रमासाठी उभारण्यात येणारा सभामंडप कोसळला आहे. यात ४ कामगार जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २८ फेब्रुवारीला यवतमाळ दौऱ्यावर येणार असून, त्यांची जाहीर सभा देखील होणार आहे. यासाठी भारी गावात ४५ एकर जागेवर मंडप उभारण्यात येत आहे. मात्र, त्यातील एक डोम उभा करण्याचे काम सुरू असतानाच पिल्लर जमिनीतून निखळला. त्यामुळे त्याचे खांब खाली क्रेनवर कोसळले. याठिकाणी काही कामगार देखील होते, परंतु कामगार सुदैवाने बचावले असून,चार जण जखमी झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यवतमाळ जिल्ह्यातील दौरा निश्चित झाला आहे. २८ फेब्रुवारीला पंतप्रधान यवतमाळ-नागपूर मार्गावरील भारी येथे आयोजित महिला बचत गटाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी हे दोन लाखांहून अधिक बचत गटांच्या महिलांना संबोधीत करणार आहे. या मेळाव्यासाठी भारी परिसरात सुमारे ४५ एकर जागेत या मेळाव्याची जय्यत तयारी केली जात असतानाच एक अपघात घडला आहे. सभेसाठी डोम उभारले जात असतानाच त्याचे तीन पिल्लर खाली कोसळले आहेत. यावेळी तिथे काम करणारे काही कामगार जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

पंतप्रधान मोदी मागील काही दिवसांपासून सतत महाराष्ट्र राज्याचा दौरा करत असून, ते चौथ्यांदा यवतमाळ जिल्हाच्या दौऱ्यावर येत आहेत. २००४ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते यवतमाळला आले होते आणि त्यांची त्यावेळी जाहीर सभा पोस्टल ग्राउंडवर झाली होती. पुढे २० मार्च २०१४ ला लोकसभा निवडणुकीपूर्वी आर्णीजवळ असलेल्या दाभडी येथे भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असतांना त्यांनी यवतमाळचा दौरा केला होता. विशेष म्हणजे त्यावेळी त्यांनी 'चाय पे चर्चा'तून देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. यानंतर लोकसभा निवडणुकीपूर्वी १६ फेब्रुवारी २०१९ रोजी यवतमाळच्या पांढरकवडा येथे महिला बचत गटाच्या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी देखील मोदींनी यवतमाळ जिल्ह्याचा दौरा केला होता. आता पुन्हा पंतप्रधान मोदी हे यवतमाळ येथे येत असल्याने महाराष्ट्र आणि यवतमाळ येथे येण्याची ही पंतप्रधानांची चौथी वेळ आहे.

विधिमंडळाचे अधिवेशन

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, उद्या, सोमवारपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर विरोधी पक्ष आक्रमक होण्याची चिन्हे आहेत. भाजप आमदार गणपत गायकवाड यांचा भर पोलीस ठाण्यातील गोळीबार, पुण्यात सापडलेला हजारो कोटींचा अमलीपदार्थांचा साठा यावरून विरोधक सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याची शक्यता आहे. अधिवेशनात दुसऱ्या दिवशी म्हणजे, २७ फेब्रुवारीला लेखानुदान अर्थात अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात येईल. विधिमंडळ सचिवालयाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज निश्चित केले आहे. त्यानुसार २६ फेब्रुवारीला अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, २०२३-२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्या मांडण्यात येतील.

महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मुक्ताराम सोनवणे यांना जाहीर

बीड । प्रतिनिधी

मुक्ताराम शिवाजी सोनवणे राहाणार गाडे पिंपळगाव ता.परळी वै.जि.बीड यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार -२०२२ जाहीर करण्यात आला.या बाबत दि.२३ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. राज्यात दरवर्षी शेती व शेतीपूरक क्षेत्रात अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतक-यास महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेती क्षेत्राशी निगडीत वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात येतो.या पुरस्कारासाठी कृषी विभागाकडून २०२२ या वर्षासाठी श्री.मुक्ताराम शिवाजी सोनवणे यांची निवड करण्यात आली.यामध्ये त्यांचा सपत्नीक मा.राज्यपाल महोदय यांच्या हस्ते व मंत्री मंडळाच्या उपस्थितीत सन्मानपत्र,स्मृतिचिन्ह,प्रोत्साहन पर रक्कम इत्यादी स्वरुपात सन्मान

करण्यात येणार आहे. सोनवणे हे एकध्यास सहाय्यपूर्ण कृषीविकास हा मंत्र आत्मसात करत गेल्या दहा वर्षा पासून शेती व शेतकरी बांधवाच्या विकासाठी शेतकरी जलसाक्षरता कार्यक्रम,शेतकरी मंडळ स्थापना,विविध शासकीय योजना शेतकरी बांधवा पर्यंत पोहोचवणे, डिजिटल साक्षरता,जन-धन योजना, शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, शेतकरी गट स्थापना,शेती जोड व्यवसायाचे प्रशिक्षण,शेतकरी मेळावे, प्रशिक्षण,अभ्यास सहली आयोजित करण्याचे काम करत आहेत. तशेच शेतकरी बांधवांच्या सेवेत जनाधार शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्येमातून शेतीमाल खरेदी-विक्री केंद्र,शेती मशागत औजारे बँक,ऊस-भाजीपाला-तुती रोपवाटिका,शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र,बियाणे बँक इत्यादी प्रकल्प व जागर ऊस शेतीचा-मराठवाडा, विषमुक्त अन्न रोगमुक्त भारत,सेंद्रिय शेती अभियान,कर्ज मुक्त शेतकरी कार्यक्रम,बळीराजा बचाव देश बचाव अभियान,पर्यावरण जनजागृती,वृक्ष लागवड इत्यादी एकध्यास सहाय्यपूर्ण कृषीविकास हा मंत्र आत्मसात करत अविरत कार्य करत आहेत.याच कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वतीने वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार -२०२२ साठी सोनवणे यांची निवड करण्यात आली.

मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122.

(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिव्हेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क. दिनांक 14/02/2024

जाहीर नोटीस

अर्जदार : चंद्रभागा अर्बन मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड

विरूध्द - गैरअर्जदार

1. लवाद अर्ज क. 155/2024 (1) संतोष मदन काळे रा. पिंपळगाव (कर्जदार) (2) शेख फारूक सुलतान (3) शेख वजिर शेख मेहेताब रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड (दोघे जामीनदार)
2. लवाद अर्ज क. 157/2024 (1) माणिक आश्रुबा लाटे (कर्जदार) (2) अशोक मंजुळा सुरवसे रा. दोघे बाभळगाव ता. माजलगाव (3) अनंत सुंदरराव पवार रा. तेलगाव ता. धारूर जि. बीड (दोघे जामीनदार)
3. लवाद अर्ज क. 158/2024 (1) चंद्रकला नवनाथ बडे(कर्जदार) (2) राहुल नवनाथ बडे (3) विक्रम गोपीनाथ बडे रा. सर्व चिंचवन ता. वडवणी जि. बीड (दोघे जामीनदार)
4. लवाद अर्ज क. 160/2024 (1) दिंगांबर दत्तात्रय सवणे रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड (कर्जदार) (2) निलेश सुरेशराव बनसोडे रा. परळी ता. परळी जि. बीड (जामीनदार)
5. लवाद अर्ज क. 163/2024 (1) संतोष अंकुश डोंगरदिवे रा. वडगाव गुंधा ता. जि. बीड (कर्जदार) (2) मन्सुरी अन्सार अहमद निसार अहमद रा. पोलिस चौकी, बार्शी नाकाच्या पाठीमागे, बीड ता जि. बीड (3) लहु संदिपान राउत रा. कानडीमाळी ता. केज जि. बीड (दोघे जामीनदार)
6. लवाद अर्ज क. 164/2024 (1) ईश्वर एकनाथ बहीरे (कर्जदार) (2) कपिल भुजंगराव नाईकवाडे (3) विजय गोरख नाईकवाडे रा. सर्व हिवरगव्हाण ता. वडवणी जि. बीड (दोघे जामीनदार)
7. लवाद अर्ज क. 167/2024 (1) विलास प्रकाशराव लाखे (कर्जदार) (2) चंद्रशेखर अरूण लाखे (3) सुरेश अशोक देशमुख रा. सर्व खोडस ता. धारूर जि. बीड (दोघे जामीनदार)
8. लवाद अर्ज क. 168/2024 (1) सुरेश बब्रुवान बडे (कर्जदार) (2) सतिश मनोहर बडे दोघे रा. दुकडेगाव ता. वडवणी जि. बीड (जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 06/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

शिक्का

नमुना इ -४
(नियम १८ पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी : श्री.व्ही.एस.जगदाळे — **पदनाम : सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.केज,जि.बीड**

सहकारी संस्थेचे नाव : केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ म.केज,ता.केज,जि.बीड

अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक : १२/०२/२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणूक) नियम २०१४ व सुधारित नियम २०१७ च्या नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करून आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हा सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी जाहिर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरिता **मी व्ही.एस.जगदाळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.केज,जि.बीड आणि मा. जिल्हा सहकारी** निवडणूक अधिकारी, बीड व मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने **केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.केज, ता.केज,जि.बीड** यांच्या समितीच्या सदस्यांची सन २०२४ त २०१९ या कालावधीची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे **केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.केज, ता.केज, जि.बीड** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या करण्यासाठी निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून **दि. २५/०२/२०२४** पासून जाहिर करीत आहे. आणि सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियम करीत आहोत.

अनुसूची

अ.क्र.	मतदार संघाचे नाव		नामनिर्देश पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा)	नामनिर्देशशन पत्राच्या यादीची प्रसिध्दी	नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ	विधीग्राह्य नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक	उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक	निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीची प्रसिध्दी करणे	मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ	मतमोजणीचा दिनांक,वेळ व स्थळ	मतमोजणी निकाल घोषित करण्याचा दिनांक
१	२		३	४	५	६	७	८	९	१०	११
१	संस्था मतदार संघ	०५	दि. २६/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि. २६/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि.०४/०३/२०२४ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि. ०५/०३/२०२४ सकाळी ११ वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि.०५/०३/२०२४ ते १९/०३/२०२४ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वा.पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि.२०/०३/२०२४ सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात)	दि. ३१/०३/२०२४ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वा.पर्यंत स्थळ - मतदान ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल.	दि. ३१/०३/२०२४ मतदानानंतर लगेच स्थळ - मतदान ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल.	दि. ३१/०३/ २०२४ रोजी मतमोजणी नंतर लगेचच.
२	वैयक्तीक मतदार संघ	०५									
३	अनुसूचित जाती किंवा जमातीतील सदस्य	०१									
४	महिला प्रतिनिधी	०२									
५	विमुक्त जाती,भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय सदस्य	०१									
६	इतर मागासवर्गीय सदस्य	०१									
	एकूण	१५									

वरील अनुसुचीमधील क्र. ०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता - कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. केज, जि.बीड कृषि उत्पन्न बाजार समिती, केजच्या जवळ, कळंब रोड, केज असा आहे. निवडणुकीसंबंधीत सर्व परिपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसूचीतील स्तंभ ३,४ व ७ मधील कामकाज शासकीय सुटीचे दिवस वगळून होईल.

स्वाक्षरीत
(व्ही.एस.जगदाळे)
केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ म.केज, ता.केज, जि.बीड

(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे

बीड जिल्ह्यातील १३ पोलिस अधिकारी बदलून गेले; जिल्ह्याला १५ नवे पोलिस

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील रहिवासी असलेले व जिल्ह्यात तीन वर्षे कालावधी पूर्ण झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. यामध्ये जिल्ह्यातील नऊ पोलिस उपनिरीक्षक, दोन पोलिस निरीक्षक, दोन सहायक पोलिस निरीक्षक असे १३ अधिकारी बदलून गेले आहेत, तर त्यांच्या जागी नवे १५ अधिकारी मिळाले आहेत. पोलिस निरीक्षक अजिनाथ काशीद यांची जालना येथे तर हेमंत कदम धाराशिवला बदलून गेले आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस अधिकाऱ्यांच्या ३१ जानेवारीपर्यंत बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यात निवडणूक आयोगाने ठरवून दिल्यानुसार ज्यांचा जिल्ह्यातील कार्यकाळ पूर्ण झाला आहे आणि जे जिल्ह्यातील रहिवासी आहेत, अशांचा समावेश होता. परंतु, या बदल्यांवर आक्षेप घेतला. त्यानंतर नव्याने यादी मागविली होती.



यासंदर्भात पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी विशेष पोलिस महानिरीक्षकांना अहवाल दिला होता. बीडमधील पोलिस निरीक्षक अजिनाथ काशीद यांची जालना येथे तर हेमंत कदम यांची धाराशिवला बदली झाली आहे. त्यांच्या जागी नवीन पीआय अद्याप आले नाहीत, ते दोघेही नियंत्रण कक्षात होते. तसेच सहायक पोलिस निरीक्षक वैभव रणखांब व नारायण गित्ते यांची छत्रपती संभाजीनगर ग्रामीणला बदली झाली. त्यांच्या जागी त्याच जिल्ह्यातून विलास मोरे व संदीप पाटील हे बीडला आले आहेत. पोलिस उपनिरीक्षक राणी सानप, भास्कर शंकर कांबळे, तुकाराम रघुनाथ बोडखे, शिवशंकर बळीराम चोपणे, देविदास बाजीराव आवारे यांची धाराशिव जिल्ह्यात बदली झाली आहे. तर ज्ञानेश्वर दत्तात्रय राडकर, चेतन वसंतराव ओगले, भागवतराव विश्वजित फरतडे, उत्तम संभाजी नागरगोजे यांची छत्रपती संभाजीनगर ग्रामीणमध्ये बदली झाली आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीणमधून देवीदास बाबूअप्पा खांडकुळे, योगेश गोविंद पवार, स्वाती नाना लहाणे, प्रभाकर आसाराम मुंजाळ, संजय मुरलीधर धुमाळ हे बीडला आले आहेत. तर धाराशिववरून बसवेश्वर रामचंद्र चेनशेट्टी, रमाकांत मोहनराव शिंदे, भागवत यशवंत गाडे, सुकुमार गणपत बनसोडे, अनघा अंकुश गोडगे, शिवाजी रणबाग सर्जे, रियाज करिमखान पटेल, पल्लवी संजय पवार बीडला आले आहेत.

बीड चंपावती महोत्सव बनला कलेचा ऐतिहासिक सोहळा

बीड । प्रतिनिधी

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, फॅन्सी ड्रेस, फॅमिली डान्स अशा विविध स्पर्धेचे एकत्रिकरण करून बालकलाकारांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देणारा आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव बीड रंगभूमीवरील कलेचा ऐतिहासिक सोहळा बनला. जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच आकाराची आकारा तालुक्यातील शेकडो शाळेतून ८४४४ विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते यामुळे चंपावती महोत्सव मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक ही स्पर्धा बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील सर्वात मोठी सांस्कृतिक चळवळ असल्याचे सिद्ध केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पासून सुरु झालेल्या या कलेच्या सोहळ्याचा समारोप २२ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री १.०० वाजता बक्षीस वितरणनाने झाला असून रात्री १.०० वाजेपर्यंत नाट्यगृहात हजारो रसिक गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून आली. नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, फॅन्सी ड्रेस, फॅमिली डान्स या सर्व स्पर्धा प्रकारातून

इंग्रजी माध्यमाच्या सेंट अन्स स्कूल आणि मराठी माध्यमाच्या आदर्श विद्यालयाने सर्वधिक बक्षीस संख्या प्राप्त करून बीड जिल्ह्याच्या इतिहासातील पहिल्या मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकावर आपले नाव कोरून जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळेचा मान मिळवला. या ऐतिहासिक कला सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सकाळी ८.०० वाजल्यापासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत नाट्यगृहात शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांची लक्षवेधी गर्दी पाहवयास मिळाली. चंपावती महोत्सवात सर्वाधिक बक्षिस संख्या प्राप्त करणाऱ्या दोन सर्वोकृष्ट शाळांना दोन मुख्यमंत्री महाकरंडक आणि विजेत्या स्पर्धाकांना एकूण ३२० बक्षिसे वितरित करण्यात आली. याबरोबरच बीड रंगभूमीच्या समृद्धीसाठी भरीव योगदान देणाऱ्या कला क्षेत्रातील नाट्य अभिनेत्री डॉ उज्वला वणवे, संगीत क्षेत्रातील सुदर्शन धुतेकर, नृत्य क्षेत्रातील अनुराधा चिंचोलकर, चित्रकला क्षेत्रातील अमित गाडे आणि नाट्य क्षेत्रातील अंकुर तांगडे यांचा विशेष चंपावती सन्मान करण्यात आला. गुरुकुल पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापीका ऋतुजा गाडीवान, आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापीका दीप्ती औटी, ट्विनकलिंग स्टार स्कूलचे मुख्याध्यापक भास्करण सर, शांतीनिकेतन इंग्लिश स्कूल मुख्याध्यापक अनिल जोशी, माय माईलस्टोन स्कूलच्या मुख्याध्यापीका सारिका जगताप यांचा जिल्ह्यातील सर्वोकृष्ट मुख्याध्यपक म्हणून सन्मान करण्यात आला. याबरोबरच पाळणा शिवबाचा या गाण्याचे कोरिओग्राफर कैलास शिंदे यांना सर्वोकृष्ट नृत्यशिक्षक म्हणून गौरव करण्यात आला. तर पोदार इंटरनॅशनल स्कूलचे सचिन मार्गे यांना सर्वोकृष्ट संगीत शिक्षक म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट चित्रकला शिक्षक म्हणून सेंट अन्स स्कूलच्या चित्रकला शिक्षक मंजुषा गिराम यांचा सन्मान करण्यात आला. सेंट अन्स स्कूलच्या दिपाली राऊत, गुरुकुल इंग्लिश स्कूलचे सचिन गरड, श्री छत्रपती शाहू विद्यालयाच्या शोभा कांबळे, विनायक विद्यालयाचे तणवीर पठाण, दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल परळीचे प्रसाद देशपांडे यांनी आपल्या शाळेचे संघप्रमुख म्हणून प्रभावी भूमिका वठवल्याबद्दल त्यांना अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नावाचा शिवसेना जिल्हाप्रमुख सन्मान देण्यात आला. कलाकारांवर प्रेम करा, कलाक्षेत्र समृद्ध करा हे संस्कार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हा शिवसैनिकांवर संस्कार बिंबवलेले आहेत. याच संस्कारांचा वसा घेऊन आम्ही बीडचे कलाक्षेत्र समृद्ध करण्यासाठी पुढाकार घेत आहोत. चंपावती महोत्सव मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक ही स्पर्धा बीडच्या मातीतील मुलांना कलाक्षेत्रात भरारी देणारी आहे हे आम्हाला कळून चुकले आहे त्यामुळे इथून पुढे सदैव चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीड रंगभूमीवर शिवसेनेचे भगवं वादळ वाहत राहील कलाकारांचे सुख-दुःख आणि अडचणीत शिवसेनेचे सर्वस्वी योगदान असणार आहे.

महामानवांच्या विचारांशी अभिप्रेत समाज निर्मिती काळाची गरज

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी संत रविदास महाराज व संत कक्कया महाराज यांची संयुक्त जयंती शनिवार २४ फेब्रुवारी रोजी राजमाता जिजाऊ कॉम्प्लेक्स ग्रामपंचायत तलवाडा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली प्रथम प्रतिमेचे पूजन करून गुरू रविदास महाराज आणि संत कक्कया महाराज यांच्या प्रतिमे समोर समाज बांधव आणि प्रमुख पाहुण्यांनी अभिवादन केले यावेळी व्यासपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब मस्के माजी सभापती जिल्हा परिषद बीड,ज्येष्ठ व्यापारी बाबुआप्पा शेटे,माजी जिल्हा परिषद सदस्य ड.सुरेश हात्ते,युवराज तात्या डोंगरे,संत रविदास प्रतिष्ठान चे अध्यक्ष आप्पा सोनटक्के, सरपंच प्रतिनिधि विष्णू हात्ते,उपसरपंच आक्रम

सौदागर,चर्मकार संघटनेचे रविनाना बोराडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. चर्मकार बांधवांच्या वतीने तलवाडा येथे चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी रविदास महाराज आणि कंक्कया महाराज यांच्या संयुक्त जयंती निमित्त महामनवांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली सर्व समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करून कार्यक्रमास आलेल्या प्रमुख पाहुण्यांचा महापुरुषांचे पुस्तक देवून स्वागत करण्यात आले. यावेळी ड.सुरेश हात्ते,बाळासाहेब मस्के, विस्तार अधिकारी उनवने साहेब,डोंगरे सर यांनी आपले विचार व्यक्त करतांना महामानवाच्या विचारांशी अभिप्रेरित समाज काळाची गजर असल्याचे प्रतिपादन केले,संतांनी विज्ञानवादी विचारधारा समाजात देवून एकसंघ मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आणि त्याच विचारावर आजच्या समाज बांधवांनी पुढे चालावे अशी भावना व्यक्त केली.

आई-वडीलांच्या शोधात फ्रान्समधून परळीत पोहचली

परळी । प्रतिनिधी

आई-वडीलांच्या शोधात २१ वर्षांची तरुणी थेट फ्रान्समधून बीडच्या परळीत पोहचली आहे. बीडच्या परळीतील वैजनाथ मंदिर परिसरात २१ वर्षांपूर्वी एका स्त्री जातीच्या अर्भकाला फेकून देण्यात आले होते. या मुलीचे सांत्वन आणि जबाबदारी फ्रान्स येथील कुटुंबांनी घेतली होती. आता २१ वर्षानंतर ही मुलगी आपल्या मूळ जन्मदात्या आई-वडिलांच्या शोधात परळीमध्ये दाखल झाली आहे. स्थानिकांच्या मदतीने ती आपल्या आई-वडिलांचा शोध घेत आहे. ८ जून २००२ रोजी परळीच्या वैद्यनाथ मंदिर परिसरात टोपलीमध्ये एक लहानगे अर्भक मंदिराचे पुजारी विनायक खिस्ते यांना आढळून आले होते. याची माहिती त्यांनी परळी पोलिसांना दिली. यानंतर हे अर्भक बालकाश्रम पंढरपूर येथे दाखल करण्यात आले. तेथून २९ जून २००२ रोजी प्रीतम मंदिर पुणे या संस्थेत दाखल करण्यात आले. तेथून तिला फ्रान्समधील असंते दांपत्याने दत्तक घेतले. यानंतर तिचं पालन पोषण केले असून, ती मुलगी आज २१ वर्षांची झाली आहे. नेहा आसांते असे तिचे नाव आहे. मात्र, आपल्या लहानपणीची सर्व माहिती जेव्हा तिला आसांते दांपत्याने दिली, तेव्हा तिला आपले आई-वडील कोण आहेत असा प्रश्न पडला. याच प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी ती आता थेट भारतात आले असून, सध्या ती परळीत पोहचली आहे. आपले जन्मदाते आई वडील कोण आहेत? याचा शोध तिच्याकडून सुरु आहे. बीडच्या वकील असलेल्या अंजली पवार या मुलीच्या मदतीला धावून आले आहेत. यासाठी त्यांनी २०२० पासून शोधकार्यास सुरुवात केली आहे. अंबाजोगाईचे दगडू दादा लोमटे आणि परळीतील बाळासाहेब देशमुख यांच्या मदतीने पुजारी खीस्ते यांचा त्यांनी शोध घेतला. त्याचबरोबर पोलीस ठाण्यातील रेकॉर्ड देखील शोधण्यात आले.

शेतकरी महासन्मान निधी योजनांच्या निधीचे वितरण

बीड । प्रतिनिधी

शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ अखेर राज्यातील ११३.६० लाख शेतकरी कुटुंबांना एकूण १५ हप्त्यांमध्ये रू. २७६३८ कोटीचा लाभ जमा झालेला आहे. या योजनेचा माहे डिसेंबर-मार्च, २०२४ कालावधीतील १६ वा हप्ता मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी सायंकाळी ४.०० वा. मौ. भारी, यवतमाळ येथिल समारंभात वितरीत होणार आहे. सदरचा समारंभ केंद्र शासनाचा कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांनी एकत्रित राबविण्याचे नियोजन केले आहे. तसेच महाराष्ट्र राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्यांचा एकत्रित लाभही पंतप्रधान महोदयांच्या शुभहस्ते या समारंभात वितरीत होणार आहे. केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १६ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी रक्कम रू. १९४३.४६ कोटीचा लाभ राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ई-केवायसी पूर्ण केलेल्या एकुण ८७.९६ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. महाराष्ट्र राज्यात सन २०२३-२४ पासून पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या पात्र शेतकरी कुटुंबांना राज्याच्या या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ अदा झालेल्या राज्यातील ८५.६० लाख शेतकरी कुटुंबाना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता रक्कम रू. १७१२ कोटी यापूर्वी अदा केलेला आहे. महाराष्ट्र शासन सन २०२३-२४ मधील उर्वरीत दुसरा व तिसरा हप्ता एकत्रितरित्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी मौ. भारी, यवतमाळ येथिल समारंभात मा. पंतप्रधान महोदयांच्या शुभहस्ते वितरीत करणार आहे. या समारंभात राज्याच्या योजनेमधून जवळपास रू. ३८०० कोटी थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत दुसरा व तिसरा हप्ता मिळून रू. ४०००/ असा एकुण रू. ६०००/ चा लाभ दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ च्या समारंभात राज्यातील सुमारे ८८.०० लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होईल. केंद्र शासनाने दि. २८ फेब्रुवारी, २०२४ हा दिवस संपूर्ण देशभर पी. एम. किसान उत्सव दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार मा. डॉ. प्रवीण गेडाम आयुक्त कृषी महाराष्ट्र राज्य यांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जिल्हा, तालुका व गावपातळीवर तसेच कृषी विज्ञान केंद्रे, सामाईक सुविधा केंद्रे या ठिकाणी पी. एम. किसान उत्सव दिवस साजरा करण्याचे निर्देश कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), दिलीप झेंडे यांनी दिले आहेत.

भयानक दुष्काळी परिस्थितीत जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड - बीड जिल्ह्यात भयानक दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना त्यावरील उपाययोजनाकडे दुर्लक्ष करत पालकमंत्री धनंजय मुंडे आणि जिल्हाप्रशासन दुष्काळात होळपळणा-या बीड जिल्ह्यातील जनतेच्या दुःखावर मीठ चोळण्याचे काम करत असुन जनतेच्या पैशातून लाखो रुपयांची उधळपट्टी करत असुन शेतकरी , कष्टकरी, गोरगरीबांच्या पैशावर डल्ला मारला जात असुन महासंस्कृती महोत्सव पुढारी आणि आधिका-यांना मिरवण्यासाठी आणि राजकीय कार्यकर्ते पोसण्यासाठी आहे का? असा प्रश्न पडला आहे.

गेवराई तालुका खरेदी विक्री संघाच्या सदस्यपदी गचांडे

बीड - गेवराई तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडी दि.२३ फेब्रुवारी रोजी निवड झाली असून यामध्ये सिरसमार्ग माजी सरपंच मादळमोही जिल्हा परिषद सर्कलचे युवा नेते सोमेश्वर गचांडे यांची निवड झाली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी अभिनंदन केले असून सर्व स्तरांतून शुभेच्छा आणि अभिनंदन केले जात आहे. गेवराई तालुका खरेदी विक्री संघाचे दि.२३ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आल्या. यामध्ये मादळमोही सर्कल मधील युवा कार्यकर्ते तथा माजी आमदार अमरसिंह पंडित माजी जि.प अध्यक्ष विजयसिंह पंडित यांचे विश्वासू कार्यकर्ते सोमेश्वर गचांडे यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल ठिकठिकाणी सत्कार करण्यात आला.

संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी

बीड - संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. अधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांनी संत शिरोमणी रोहिदास यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संजय हांगे, हर्षद कांबळे,बंडु गायकवाड, गोटिराम गोरेल,राम घडसे, अविनाश चव्हाण उपस्थित होते.

सिव्हीमधील क्रिटीकल केअर ब्लॉकचे भूमिपुजन

बीड - जिल्हा रुग्णालयात पीएम - अभिम अभियानातून नव्याने बांधण्यात येणाऱ्या ५० खाटांच्या स्वतंत्र क्रिटीकल केअर युनिटचे भूमिपुजन रविवारी (दि. २५) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ४ : ४५ वाजता ऑनलाईन होणार असल्याची माहिती, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. अशोक बडे यांनी दिली. जिल्हा रुग्णालयात देखील हा कार्यक्रम होणार असून यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे, खासदार डॉ. प्रितम मुंडे, खासदार रजनी पाटील, आमदार सुरेश धस, विक्रम काळे, सतीश चव्हाण, संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके, लक्ष्मण पवार, बाळासाहेब आजबे, नमिता मुंदडा, आरोग्य सचिव नवीन सोना, आरोग्य अभियान आयुक्त धीरज कुमार, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, आरोग्य उपसंचालक अर्चना भोसले यांची उपस्थिती राहणार असल्याची माहितीही, डॉ. अशोक बडे व जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. उल्हास गंडाळ यांनी दिली. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मांडवीय, राज्यमंत्री डॉ. भारती पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री तानाजी सावंत आदींची मुंबईत उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण जिल्हा रुग्णालयाच्या अधिनस्थ सर्व ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालयांत होणार आहे. सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. अशोक बडे व डॉ. उल्हास गंडाळ यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com